| CNR-MHYA110002082006 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | ३०.०७.२००६ |
| | नोंदणी दिनांक | ३०.०७.२००६ |
| | निकाल दिनांक | १०.०८.२०२६ |
| | कालावधी | १९व. ०९म. ११दि. |

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.१, उमरखेड यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती आर.ए.ए.खतीब)**

**<u>नियमीत फौजदारी खटला १८५/२००६</u>** **<u>निशाणी– ७७</u>**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन, बिटरगांव ता. उमरखेड जि. यवतमाळ. |
| उपस्थिती | **सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता, श्री. बी.एम. भगत** |
| आरोपी | **०१. जांबुवंतराव राघोजी भरकाडे,**<br>वय: ३८ वर्षे, धंदा: मजुरी/शेती,<br>**०२. राघोजी नारायण भरकाडे,(मयत)**<br>वय: ६५ वर्षे, धंदा: शेती,<br>**०३. सौ. पुंजाबाई राघोजी भरकाडे,**<br>वय: ५५ वर्षे, धंदा: घरकाम,<br>सर्व रा. मोरचंडी, ता. उमरखेड जि. यवतमाळ. |
| उपस्थिती | **आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एस.पी. मुडे** |

**नमुना–ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | सन १९९९ ते २५.०९.२००६ च्या दरम्यान |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २५.०९.२००६ |
| दोषारोप दिनांक | २१.०२.२००९ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २१.०२.२००९ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | --निरंक-- |
| न्यायनिर्णय तारीख | १०.०८.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | --निरंक-- |

## नमुना क

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जांबुवंतराव राघोजी भरकाडे | १३.१०. २००६ | १३.१०. २००६ | भा.दं.वि. ४९८-अ, व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | राघोजी नारायण भरकाडे (मयत) | १३.१०. २००६ | १३.१०. २००६ | भा.दं.वि. ४९८-अ, व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे. | उपक्ष मित | निरंक | निरंक |
| ३. | सौ. पुंजाबाई राघोजी भरकाडे | १३.१०. २००६ | १३.१०. २००६ | भा.दं.वि. ४९८-अ, व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## नमुना ड

## सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ- सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | शामराव मारोती भुरके | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.२ | शंकर कान्हा डाकोरे | साक्षीदार |
| सा.क्र.३ | रंजना जांभुवंत भरकाडे | फिर्यादी |

## ब– बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी कागदपत्रे

## अ–सरकारी

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २८ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस |
| २. | ४९ | तक्रार |
| ३. | ५० | छापील एफ.आय.आर |

## ब–बचावपक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क–न्यायालय

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड–जप्त मुद्देमाल

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १०.०८.२०२६)

आरोपी हे भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि. असे

संबोधण्यात येईल) चे कलम ४९८-अ व ५०४ सह कलम ३४ कायद्यांतर्गतचे खटल्यास सामोरे जात आहेत.

**<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,</u>**

२. फिर्यादी, नामे सौ. रंजना जांबुवंतराव भरकाडे यांनी पोलीस स्टेशन, बिटरगांव येथे फिर्याद दिली की, सन १९९९ मध्ये त्यांचे लग्न जांभुवंतराव भरकाडे यांचेसोबत झाले त्यांचेपासुन त्यांना दोन मुली माया व छाया आहेत व ते त्यांच्या सासु व सासऱ्यासोबत एकत्र राहत असत. काही दिवस त्यांनी त्यांना चांगले वागविले. नंतर आरोपी क्र. १ हा रोज दारु पित असे व त्यांना नेहमी मारहाण करत असे. तो म्हणत होता की, माझ्या नोकरीसाठी तुझ्या माहेरवरुन वडीलाकडुन ४०,०००/- रुपये हुंडा म्हणुन घेऊन ये, असे म्हणुन तो त्यांना नेहमी मारहाण करीत असे व सासु, सासरा हे दोघेही नवऱ्याला मारहाण करण्यास सांगत असे. त्यांच्या वडीलांची परिस्थिती गरीब असल्यामुळे त्यांनी नवऱ्याला पैसे देण्यास नकार दिला, तेंव्हापासुन त्यांचा नवरा त्यांना नेहमी मारहाण करत असे. त्यांची सासु-सासरा सुध्दा नेहमी शिवीगाळ करुन त्रास देत होते, त्यांचे त्रासाने त्यांना त्यांच्या नवऱ्याने दिनांक १३.०९.२००५ रोजीला नवरा, सासु व सासरा यांनी मारहाण केली व तुला नांदावयाचे असेलतर तुझ्या वडीलांकडुन ४०,०००/- रुपये नोकरी करीता घेऊन ये नाहीतर तु पुन्हा परत येऊ नकोस असे म्हणुन त्यांच्या नवऱ्याने त्यांच्या वडीलांकडे नेऊन सोडले. दिनांक १४.०९.२००५ रोजी त्यांचे वडीलांनी त्यांना कोर्टा येथुन त्यांचे सासरी मोरचंडी येथे नेऊन सोडले तर त्यांचे नवराने म्हटले की, तु नोकरीसाठी ४०,०००/- रुपये घेऊन आली का तर तेंव्हा त्या नाही म्हणाले असता त्यांच्या नवऱ्याने तिला मारहाण करुन घरातुन बाहेर काढुन दिले. करिता रिपोर्ट.

३. सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, बिटरगांव यांनी आरोपीं विरुध्द गुन्हा क्रमांक २५/२००६ भा.दं.वि. कलम ४९८-अ व ५०४ सह कलम ३४

अन्वये नोंदविण्यात आला. ए.एस.आय. श्री. तुकाराम पवार यांनी घटनेचा पुढील तपास केला. आरोपीं विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोपीं विरुध्द भा.दं.वि चे कलम ४९८-अ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

**४.** अभिलेखावरील तक्रार व कागदपत्रे पडताळुन मी, आरोपीं विरुध्द कलम ४९८-अ व ५०४ सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये दोषारोप निशाणी क्र. २२ नुसार निश्चित केला व आरोपींना त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपीं विरुध्द गुन्हा सिद्ध होइल असा पुरावा आढळुन आल्याने आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे बयान अनुक्रमे नि क्र. ७५ व ७६ वर नोंदविण्यात आले.

**५.** अभियोग पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी.एम. भगत व आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. एस.पी. मुडे यांच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील वादप्रश्न विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सन १९९९ ते दिनांक २५.०९.२००६ च्या दरम्यान मौजे मोरचंडी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथे तुम्ही आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला तुझ्या माहेरवरुन रु. ५०,०००/– घेऊन ये तर तुला वागवितो, नाहीतर वागवित नाही अशी बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्याकरीता तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला व त्याद्वारे कलम ४९८–अ सह कलम ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपींनी | |

| | | |
|---|---|---|
| | संगणमताने सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने शिवीगाळ करुन अपमानित केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

**कारणमिमांसा**

**६.** आरोपीं वरील दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी अ.सा.क्र.१ ते ३ यांना वर तपासले. घटनास्थळ पंच, साक्षीदार व तपासीक अमलदार यांना वारंवार साक्षी समन्स व वारंट काढून सुद्धा अभियोग पक्ष त्यांना हजर ठेवण्यास असमर्थ ठेवल्याने निशाणी क्र.०१ वर दिनांक ०३.११.२०२५ रोजी पुरावा बंदचा आदेश पारीत करण्यात आला.

**मुद्दे क्रमांक १ व २ करिता-**

**७.** अ.सा.क्रं.३ फिर्यादी रंजना जांबुवंत भरकाडे यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, जांबुवंत हे तिचे पती, राघोजी व पुंजाबाई हे तिचे सासु–सासरे आहेत. तिचे लग्न वर्ष १९९९ मध्ये झाले होते. त्यानंतर त्या सासरी गेल्या तेथे काही दिवस त्यांच्या सासु–सासरे व पतीने त्यांना चांगले नांदविले त्या कालावधीत त्यांना दोन मुली झाल्या. तिचे पती आरोपी क्र. तिला दारुच्या नशेत शिवीगाळ करीत व तिचा छळ करीत होते. आरोपी क्र. १ याने तिला तिच्या वडीलांकडुन रु. ५०,०००/– घेऊन ये अशी मागणी केली होती.

तिच्या वडीलांची परिस्थिती गरीब असल्यामुळे त्यांनी त्यांची मागणी पुर्ण करु शकले नाहीत. त्यामुळे आरोपी हे तिला सतत त्रास द्यायचे. दिनांक १३.०९.२००५ रोजी आरोपी क्र. १ याने तिला आरोपी क्र. २ व ३ च्या चिथावणीवरुन मारहाण केली. त्यानंतर दिनांक १४.०९.२००५ रोजी रु. ५०,०००/– च्या मागणीवरुन सर्व आरोपींनी तिचा छळ करुन तिला वाईट वागणुक दिली. तेंव्हापासुन ति तिच्या वडीलांकडे राहते. त्यानंतर तिने पोलीस ठाण्यात तक्रार व छापील एफ.आय.आर अनुक्रमे नि क्र. ४९ व ५० दिली. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर तिची सही आहे.

८. उलटतपासात तिने हे मान्य केले की, लग्नाच्या वेळेस आरोपी क्र. १ हे शिक्षण म्हणुन नोकरी करत होते व लग्नानंतर आरोपी हे तिच्यासोबत चांगल्या पद्धतीने राहत होते. पुढे तिने हे नाकारले की, आरोपी क्र. १ ची नोकरी गेल्यामुळे तिने त्याच्यासोबत नांदण्यास नकार दिला होता. पुढे तिने हे सुद्धा नाकारले की, आरोपीने तिने नांदण्यास यावे म्हणुन दोन वेळा प्रयत्न सुद्धा केला होता. पुढे तिने हे नाकारले की, आरोपींनी तिला रु. ५०,०००/– ची मागणी करुन मारहाण केली नाही.

९. अ.सा.क्रं.१ घटनास्थळ पंच शामराव मारोती भुरके यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, पोलीसांनी त्यांना घटनास्थळ पंचनाम्याकरीता बोलावले होते. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहीत

नाही. त्यांनी फक्त पंचनाम्यावरील सही मान्य केली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनेस सहाय्य केले नसल्याने त्यास फितूर घोषीत करुन सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, त्यादरम्यानही त्याने अभियोग पक्षाच्या कथनेस पुरक होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही.

**१०.** अ.सा.क्रं. ३ शंकर कान्हा डाखोरे यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, त्यांना घटनेबाबत काहीही माहीत नाही. ते फिर्यादीला ओळखतात. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनेस सहाय्य केले नसल्याने त्यास फितूर घोषीत करुन सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, त्यादरम्यानही त्याने अभियोग पक्षाच्या कथनेस पुरक होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही.

**११.** एकंदरीत, अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपींनी फिर्यादीला लग्नानंतर काही दिवस चांगले नांदविले व त्यानंतर रु. ५०,०००/– मागणी करुन तिचा छळ केला ही बाब सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादी रंजना (अ.सा.क्र. ३) हिला तपासले तसेच फिर्यादीच्या साक्षेला दुजोरा देण्याकरीता (अ.सा.क्र. २)शंकर यांना तपासले परंतु साक्षीदार फितुर झाल्याने त्याची साक्ष ग्राह्य धरता येणार नाही तसेच अभियोग

पक्षाने घटनास्थळ पंच शामराव (अ.सा.क्र. १) यांना सुद्धा तपासले परंतु पंचसाक्षीदार हे फितुर झाल्याने पंचनामा सिद्ध झाला नाही. अभियोग पक्षाने ईतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपासीक अमलदारा यांना वारंवार साक्ष समन्य व वारंट काढुन सुद्धा त्यांची साक्ष नोंदवण्यास अभियोग पक्ष असफल ठरले त्यामुळे फक्त फिर्यादीच्या साक्षेवर अवलंबुन राहुन आरोपींना दोषी ठरवणे न्यायोचित होणार नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ याचे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करिता –</u>**

**१२.** वरिल पुराव्यावरुन आरोपीं विरुद्ध गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे, एकंदरीत अभिलेखावरील पुरावा पाहता, अपु–या पुराव्या अभावी आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आरोपी क्र. २ राघोजी नारायण भरकाडे मयत असल्याने त्यांच्या विरुद्ध सदरील प्रकरण नि क्र. १ वर आदेश पारीत करुन उपक्षमित करण्यात आले. मी, मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्र. १ व ३ दोघेही रा. मोरचंडी, ता. उमरखेड जि. यवतमाळ यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कायद्याचे कलम ४९८-अ व ५०४ सह कलम ३४ अन्वये या दोषपात्र गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी यापुर्वी सादर केलेला जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहेत.

३. वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/–, (रुपये पंधरा हजार फक्त), चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन या न्यायालयात दाखल करावा, सदर जामीन कदबा आजपासुन पुढील सहा महिन्यापर्यंत अस्तित्वात राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RUBINA ANJUM AMJADUDDIN KHATEEB
Date: 2026.08.10 17:17:57 +0530

**(आर.ए.ए.खतीब)**

दिनांक १०.०८.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
उमरखेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order/judgment are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A. A. Dake |
| Name of Court | Smt.R.A.A.Khateeb, Jt. C.J.J.D & J.M.F.C. Umarkhed |
| Date of Dictation | 10.08.2026 |
| Judgment signed by the P.O. on | 10.08.2026 |
| Judgment uploaded on | 10.08.2026 |